# निशाणी क्र. ५४ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी त्यांच्या विरुद्ध झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी हा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा हा जाहीर ठराव होवून मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायलयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासरखे होणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांची कैफियत स्वीकारण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. मात्र, प्रस्तुत प्रतिवादी यांना कैफियत देण्यास साधारणपणे चार महिने व चोवीस दिवस इतका कालावधीचा विलंब झालेला आहे असे दिसून येते. सबब, विलंबाचे प्रमाण पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांनी झालेल्या विलंबाकरीता खर्चाची रक्कम रुपये ५००/–

(रु. पाचशे फक्त) देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादी यांनी रुपये ५००/– (रु. पाचशे फक्त) खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्यांनी रुपये २५०/– (रु. दोनशे पन्नास फक्त) वादी यांना दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. प्रतिवादी यांनी वरील पूर्तता केल्यानंतर त्यांच्या विरुद्धचा कैफियत नाहीचा आदेश रद्द करण्यात येवून त्यांची कैफियत स्वीकारणेत येते.

स्थळ : कोरेगाव
दिनांक : २०/११/२०२१

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.